# भूगोल विभाग उपक्रम : (२०२१-२०२२)

## वसुंधरा दिन २०२२(भूगोल विभाग)

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथील भूगोल विभागाच्या वतीने शुक्रवार, दिनांक २२/०४/२०२२ या दिवशी जागतिक वसुंधरा दिनाचे औचित्य साधून वसुंधरा दिन साजरा केला. या दिनाच्या निमित्ताने वसुंधरेचे महत्व विध्यार्थांना व्हावे यासाठी व्याख्यानाचे आयोजन केले गेले. या कार्यक्रमात व्याख्याते म्हणून डॉ. रवींद्र भगत यांना बोलाविण्यात आले. डॉ. भगत सर हे एस. एस. ढमढेरे महाविदयालय, तळेगाव ढमढेरे येथे भूगोल विभाग प्रमुख म्हणून कार्यरत आहे. या कार्यक्रमचे प्रास्ताविक डॉ. ज्योतिराम मोरे सरांनी केले. तर व्याख्याते व प्रमुख पाहुण्याचा परिचय विदयार्थी प्रतिनिधी कु. शरद मळेकर यानी केले. मान्यवरांचे स्वागत व अध्यक्षीय भाषण आपल्या महाविद्यालयाचे प्राचार्य मेजर डॉ. अशोक व्ही. गिरी यांनी केले. या कार्यक्रमाचे आभार प्रा. सचिन कांबळे यांनी मानले तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. सुभाष शिंदे सरांनी केले. या संपूर्ण कार्यक्रमाच्या नियोजनात आपल्या मदविद्यालायातील भूगोल विभाग प्रमुख डॉ. ज्योतिराम मोरे, कला शाखा प्रमुख डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, तसेच भूगोल विभागातील प्रा. निखिल आगळे, कला शाखेतील प्रा. सचिन कांबळे व सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी केले. या कार्यक्रमास एकूण १०२ विद्र्यार्थी हजर होते.

**वसुंधरा दिनाच्या कार्यक्रमातील काही क्षणचित्र**

















## भूगोल दिन २०२२(भूगोल विभाग)

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथील भूगोल विभागाच्या वतीने शुक्रवार, दिनांक १४/०१/२०२२ या दिवशी भूगोल दिनाचे औचित्य साधून भूगोल दिन साजरा केला. या दिनाच्या

निमित्ताने भूगोल विषय व पर्यावरणाचे महत्व विध्यार्थाना व्हावे यासाठी गुगल फॉर्मच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने भूगोल सामान्यज्ञान प्रश्नमंजुषेचे आयोजन केले गेले. प्रश्न मंजुषेत सहभागी स्पर्धकांसाठी ई-प्रमाणपत्राचे आयोजन केलेले होते.या प्रश्नमंजूषेच्या माध्यमातून १०७ पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यासर्वांना त्याच्या ईमेल आयडी वर ई - प्रमाणपत्र देण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेच्या नियोजनात आपल्या मदविद्यालायातील प्राचार्य मेजर डॉ. अशोक व्ही गिरी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, भूगोल विभाग प्रमुख डॉ. ज्योतिराम मोरे, कला शाखा प्रमुख डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, तसेच भूगोल विभागातील प्रा. निखिल आगळे सहभागी होते.

## ओझोन दिवस २०२१(भूगोल विभाग)

भारतीय जैन संघटनेचे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय येथील भूगोल विभागाच्या वतीने शुक्रवार, दिनांक १६/०९/२०२१ या दिवशी जागतिक ओझोन दिनाचे औचित्य साधून ओझोन दिन साजरा केला. या दिनाच्या निमित्ताने ओझोन थराचे व त्याचे पर्यावरणाचे महत्व विध्यार्थाना व्हावे यासाठी गुगल फॉर्मच्या माध्यमातून ऑनलाईन पद्धतीने भूगोल सामान्यज्ञान प्रश्नमंजुषेचे आयोजन केले गेले. प्रश्न मंजुषेत सहभागी स्पर्धकांसाठी ई-प्रमाणपत्राचे आयोजन केलेले होते.या प्रश्नमंजूषेच्या माध्यमातून १३५ पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. त्यासर्वांना त्याच्या ईमेल आयडी वर ई - प्रमाणपत्र देण्यात आले. या संपूर्ण स्पर्धेच्या नियोजनात आपल्या मदविद्यालायातील प्राचार्य मेजर डॉ. अशोक व्ही

गिरी, महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. किशोर देसर्डा, भूगोल विभाग प्रमुख डॉ. ज्योतिराम मोरे, कला शाखा प्रमुख डॉ. सिद्धेश्वर गायकवाड, तसेच भूगोल विभागातील प्रा. निखिल आगळे सहभागी होते.

**डॉ. ज्योतिराम मोरे**

**भूगोल विभाग, प्रमुख**